# झुंज

## मधुकर तोरडमल

# झुंज

मधुकर तोरडमल

RAMNATH PANDIT CENTRE FOR FUNDAMENTAL RESEARCH IN INDIAN THEATRE
Date..................
ESTD. 1981

मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई

प्रकाशक :
केशव विष्णु कोठावळे
मॅजेस्टिक बुक स्टॉल
गिरगाव नाका, मुंबई ४

मुद्रक :
अ. के. कोठावळे
ॐ मुद्रणालय
२५० अ, शनिवार पेठ
पुणे ३०

किंमत दहा रुपये

पहिली आवृत्ती : मार्च १९८२

DRM १२०६ । ८१

© प्रा. मधुकर तोरडमल
८, 'ज्ञानदेवी', साहित्य सहवास
वांद्रा पूर्व, मुंबई ५१

मुखपृष्ठ : कमल शेडगे

या नाटकाच्या व्यावसायिक, हौशी किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या प्रयोगांचे हक्क सौ. प्रमिला मधुकर तोरडमल यांच्याकडे आहेत. त्यांच्या लेखी परवानगीशिवाय कुणालाही या नाटकाचा कोणत्याही प्रकारचा उपयोग करून घेता येणार नाही. चित्रपट, टी. व्ही., रेडिओ वगैरे इतर कोणत्याही माध्यमातून या नाटकाचा उपयोग करण्याचे किंवा भाषांतर वा रूपांतर करण्याचेही अधिकार सौ. प्रमिला तोरडमल यांच्याकडेच आहेत.

झुंज या नाटकाचा विषय आज फार फार महत्त्वाचा आहे. तितकाच तो हळवा झालेला आहे. वादग्रस्त आहे. नाटकाच्या चौकटीत असा विषय बसवणे आणि त्या चौकटीत तो मावणे कठीणच आहे. पण आज प्रत्येक विचारी माणसाने आपआपल्या माध्यमातून या विषयावरचे विचार मोकळेपणाने मांडणेही फार निकडीचे आहे. माझ्या परीने माझ्या माध्यमातून या विषयावरचे विचार मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. यात सर्वच विचार सविस्तरपणे मांडले गेले आहेत असे नाही. मांडलेले विचार सर्वांना पटतील असेही नाही. या प्रश्नाच्या अनेकानेक बाजू आहेत. त्या सर्व बाजूंचा विचार नाटकासारख्या माध्यमातून करणे म्हणजे नाटकाच्या तीन अंकांच्या खांबावर आकाश पेलण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे. नाटककार म्हणून माझ्या सीमांची मला पूर्ण कल्पना आहे. तेव्हा अनेक बाजूंनी मी तोकडा पडलेलो असेन याचीही मला जाणीव आहे. पण आधीच म्हटल्याप्रमाणे मी हा माझ्या कुवतीप्रमाणे केलेला प्रयत्न आहे. मांडलेले विचार जास्त जास्त समतोल असतील याची काळजी घेतलेली आहे. दलितांचे जीवन मी अगदी जवळून अभ्यासिले आहे असेही नाही. त्यामुळे त्यांच्या समस्यांचे अगदी तळापर्यंत आकलन मला झालेले आहे असा माझा मुळीच दावा नाही. हा एका पांढरपेशाने अत्यंत प्रामाणिकपणे आपल्या मनातले विचार मांडण्याचा केलेला प्रयत्न आहे. टी. व्ही. वर झालेल्या मुलाखतीत मी म्हटल्याप्रमाणे पांढरपेशा मध्यमवर्गाची अवस्था दलितांच्यापेक्षाही दलित अशी झालेली आहे असे मला वाटते. तेव्हा दोघाही 'दलितांनी' आपआपल्या परीने कुठे तरी समान पातळीवर येऊन एकमेकांचा विचार करावा असे वाटते.

हे नाटक लिहिताना दलित लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकांचे वाचन केले. आयर्व्हिंग वॉलास यांच्या 'द मॅन' या पुस्तकाचेही वाचन झालेलेच होते. दलित समस्येवर लिहिलेले वृत्तपत्रीय लिखाणही वेळोवेळी वाचनात येतच होते. या सर्वांचा उपयोग झाला. या सर्वांचा मी ऋणी आहे.

या नाटकाचे निर्माते चंद्रलेखेचे मोहन वाघ, तसेच चंद्रलेखेचे व्यवस्थापक मनोहर कदम तसेच सर्व कलाकार, तंत्रज्ञ आणि बॅक स्टेज वर्कर्स यांचाही मी ऋणी आहे.

हे नाटक पुस्तकरूपाने प्रसिद्ध करणारे माझे प्रकाशक श्री. केशवराव कोठावळे यांचा तर मी ऋणी नेहमीच असतो.

मधुकर तोरडमल

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[ जिल्ह्याच्या ठिकाणचं एक महाविद्यालय. व्हाइस प्रिन्सिपल ऋषी यांचं ऑफिस. कॉलेजच्या मुख्य दरवाज्याबाहेर प्रा. कांबळे यांचं आमरण उपोषण चालू आहे. त्या दिशेनं मुलांच्या घोषणा ऐकू येतात – " प्रा. कांबळे झिंदाबाद ", " प्रिन्सिपल अभ्यंकर मुडदाबाद ", " जातिद्वेष गाडून टाका ", " प्रा. कांबळयांवरचा अन्याय दूर झालाच पाहिजे " — या घोषणा व्हाइस प्रिन्सिपल ऋषी, प्रा. चव्हाण व प्रा. गुप्ते ऐकत आहेत. ]

प्रा. ऋषी : हळूऽऽ हळूऽऽ हळूऽऽऽ ! अरे किती मोठा आवाज करताहेत ही मुलं ! अरे हळू ओरडा रे बाबांनो, हळू ओरडा...

प्रा. चव्हाण : अहो हळू ओरडा काय सर ? हळू कसं ओरडता येईल माणसाला ?

प्रा. गुप्ते : आणि ते घोषणा देताहेत —

प्रा. ऋषी : घोषणा द्या, पण इतक्या अगदी बेंबीच्या देठापासून कशाला ? केवढं नाइज् पोल्यूशन हे !

प्रा. गुप्ते : कुणाला कशाचं आणि ऋषीसरांना आपलं नॉइज् पोल्यूशनचं !

प्रा. चव्हाण : हो. बाहेर तिकडं ज्वालामुखी धुमसतोय, स्फोट होऊन केव्हा काय आकान्त होतोय याची आम्हाला चिंता, आणि यांना काळजी नॉइज् पोल्यूशनची.

प्रा. गुप्ते : अहो वातावरण केवढं तप्त आहे. आय टेल् यू, इट्स गोइंग टू बी टोटल वॉर नाऊ. हा कांबळे उपासात मरेल, पण माघार घेणार नाही.

प्रा. चव्हाण : सकाळी बेशुद्ध झाला होता म्हणे.

प्रा. गुप्ते : अहो बेशुद्ध होईल नाही तर काय ? आज त्याच्या उपासाचा अकरावा दिवस.

[ इतक्यात प्यून कुलकर्णी लगबगीनं प्रवेश करतो. ]

प्रा. चव्हाण : काय रे कुलकर्णी ?

कुलकर्णी : आत्ताच डॉक्टर तपासून गेले. ब्लडप्रेशर फार लो झालंय म्हणतात.

प्रा. ऋषी : राम राम राम ! आणि आता प्रिन्सिपल अभ्यंकरसुद्धा इथं नाहीत. नेमकी याच वेळेला पुण्याला युनिव्हर्सिटीची मीटिंग निघाली.

प्रा. चव्हाण : आणि इथं असते तरी त्यांनी मुळीच आपला स्टँड बदलला नसता. आधी उपोषण सोडा, मगच बोलणी करायला बसेन, असं ठणकावून बजावलंय त्यांनी कांबळयाला.

प्रा. गुप्ते : हो. आणि एकदा स्टँड घेतला की प्रिन्सिपल अभ्यंकर ईज ऑल्वेज् फर्म लाइक अ रॉक !

प्रा. चव्हाण : ते ठीक आहे. पण आता कॉलेजच्या फाटकाबाहेर या कांबळयाचा रक्तदाब लो झालाय — समजा मेंदूतली एखादी शीर तुटली, हार्ट ॲटॅक आला, किंवा असंच काही कॉम्प्लिकेशन झालं आणि हा मेला तर बाहेर जमा झालेली ही पिशाच्चसेना कॉलेज ठिकाणावर ठेवणार आहे का ? अहो, तुम्हाआम्हाला आत कोंबून सगळं कॉलेज पेटवून द्यायला कमी करणार नाहीत.

प्रा. गुप्ते : मंडळी, मी काय म्हणतो — तो पाहा गायकवाड येतोय. त्यालाच कांबळया-कडं समाचाराला म्हणून पाठवू.

प्रा. चव्हाण : काय उपयोग ? कांबळे काय ऐकणार आहे ? सगळ्या दुनियेनं लाख समजावून सांगितलं, पण सगळ्यांना फाट्यावर मारून उपोषणाला बसलाच ना तो ! आता तो काय गायकवाडचं ऐकणार आहे ?

प्रा. गुप्ते : न ऐकू देत हो. आपल्याला काय, अभ्यंकरसर येईपर्यंत काळ काढायचा. नुसता प्रयत्न करून पाहायला काय हरकत आहे ? अहो, तो कांबळे महार, हा गायकवाडही महारच —

प्रा. ऋषी : गुप्ते, गुप्ते, काय हे ? अहो 'महार' काय ? हरिजन तरी म्हणा !

प्रा. गुप्ते : तेच हो ते. तर मुख्य मुद्दा काय ? ज्याची भाषा त्याला समजेल. निदान दगडापेक्षा वीट मऊ वाटेल. प्रिन्सिपल अभ्यंकर इथं येऊन पोचेपर्यंत संकट तरी टळेल.

प्रा. ऋषी : हो. ते इथं नसताना स्फोट व्हायला नको.

प्रा. गुप्ते : ( बाहेर डोकावत ) प्रा. गायकवाड —

प्रा. गायकवाड : ( बाहेरूनच ) येस ?

प्रा. गुप्ते : एक मिनिट जरा आत येता का ?



प्रा. गायकवाड : ( आत येत ) बोला.

प्रा. चव्हाण : बाहेर कांबळयांचं ब्लडप्रेशर फार वाढलंय असं ऐकतो. तुम्ही जरा त्यांना भेटून आलात तर —

प्रा. गायकवाड : मी भेटून काय उपयोग होणार आहे ?

प्रा. गुप्ते : ते बरोबरच आहे. पण काय आहे — प्रिन्सिपल अभ्यंकर गेलेत पुण्याला. ते इथं असले म्हणजे सगळ्यांनाच फार मोठा आधार असतो. ते नसताना इथं काही कमीजास्त होऊ नये एवढंच आम्हाला वाटतं. अहो, कांबळे कुठलाही डॉक्टरी इलाज करून घ्यायलासुद्धा नकार देताहेत.

प्रा. चव्हाण : आमचं कुणाचं ऐकायलाच ते तयार नाहीत. कदाचित तुमचा शब्द मोडणार नाहीत.

प्रा. गायकवाड : का ?

प्रा. चव्हाण : का म्हणजे ? ( गोंधळतात. )

प्रा. गायकवाड : समजलो. पण त्याचा काही उपयोग नाही. कांबळे कुणाचंही ऐकणार नाहीत. जातभाईंचंसुद्धा नाही !

प्रा. गुप्ते : नाही, माझ्या म्हणण्याचा उद्देश —

प्रा. गायकवाड : उद्देश कोणताही असू देत. पण मूळ मतलब तोच होता.

प्रा. चव्हाण : गायकवाड, प्रसंग अतिशय नाजूक आणि तितकाच गंभीर आहे. अभ्यंकरसर इथं नाहीत, कांबळयांच्या उपोषणाचा आजचा अकरावा दिवस, ते सीरियस आहेत, कॉलेजच्या गेटबाहेर लोकांची गर्दी जमा झालीय...

प्रा. गुप्ते : आणि हे लोक म्हणजे कोण आहेत ? सगळे भडक माथ्याचे तरुण आहेत. त्यातला एकही चेहरा शांत आणि विचारी माणसाचा दिसत नाहीय.

प्रा. ऋषी : ओरडतात केवढ्यांदा. नुसतं त्यांचं ओरडणं ऐकलं तरी वाटतं, ही माणसं नाहीत, जंगलातले हिंस्र पशू जमा झालेत सगळे.

प्रा. चव्हाण : त्यात नुसते तुमचे ते नवे ॲंग्री यूथ नाहीत, राजकारणी गुंड आहेत, भाडोत्री मवाली आहेत, हुल्लडबाजीचा फायदा घेऊन लूटमार करणारे चोर-मामटे आहेत.

प्रा. गायकवाड : तुम्ही मला का सांगताय हे सगळं ?

प्रा. गुप्ते : समजा, बाहेर तुमच्या कांबळयांना काही झालं —

प्रा. चव्हाण : त्याच निमित्ताच्या ठिणगीची वाट पाहाताहेत सगळे.

प्रा. गुप्ते : ती ठिणगी पडायचा अवकाश — ही सारी पिशाच्चसेना उभं कॉलेज पेटवायला निघेल. बेदम मारझोड होईल. मोडतोड झाली, जाळपोळ झाली, तर संस्थेचं लाखो रुपयांचं नुकसान होईल.

प्रा. गायकवाड : हो. पण याचा विचार संस्थेनं करायचा.

प्रा. चव्हाण : तुम्ही संस्थेचे नोकर नाही ? संस्थेशी तुमची काही बांधिलकी नाही ? काही निष्ठा नाही ?

प्रा. गायकवाड : आहे ना. पण माणसाच्या इतर काही निष्ठाही असू शकतात. माणूस म्हणून इतर माणसांशीही तो बांधलेला असू शकतो.

प्रा. ऋषी : हे तुमचं म्हणजे एकाच वेळी दोन घोड्यांच्या पाठींवर पाय ठेवून पळण्यासारखं झालं.

प्रा. गायकवाड : बरोबर बोललात. हल्ली दोन घोड्यांच्या पाठींवर पाय ठेवूनच पळतोय मी. जीवघेणी कसरत करतोय. प्राण कासावीस होताहेत. पण इलाज नाहीय. खांद्यावर क्रूस आलाय तो वाहिलाच पाहिजे.

प्रा. चव्हाण : तुमच्या बोलण्याचा अर्थ समजलो नाही मी.

प्रा. गायकवाड : समजून घेण्याचाही प्रयत्न करू नका. तुम्हाला कधीच समजायचं नाही ते.

प्रा. चव्हाण : का ?

प्रा. गायकवाड : जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे.

प्रा. गुप्ते : याचा अर्थ, कांबळयांच्या उपोषणाला तुमचा मनातून पाठिंबा आहे. प्रिन्सिपल अभ्यंकरांच्या विरुद्ध बंडखोरीचे विचार आहेत तुमच्या मनात.

प्रा. गायकवाड : माझ्या मनात काय आहे ते तुमच्यापेक्षा प्राचार्य अभ्यंकरांना जास्त माहिती आहे.

प्रा. गुप्ते : तोंडानं तुम्ही असं बोलता, पण आहात छुपे जातीयवादीच.

प्रा. गायकवाड : बरोबर आहे तुमचं. मी जातीयवादी होण्याचाच प्रयत्न करतोय. सगळ्या जगात एकच जात असावी असं वाटणाऱ्यांपैकी मीही एक होण्याचा प्रयत्न करतोय. एकच जात, माणसाची. खूप अवघड जातंय. पण प्रयत्न करतोय. अर्थात माझ्या परीनं.

प्रा. चव्हाण : तेच आम्ही म्हणतोय. तुमच्या परीनंच प्रयत्न करा. आणि त्या कांबळयांची समजूत घाला. निदान प्राचार्य अभ्यंकर येईपर्यंत मरू नकोस म्हणावं.

प्रा. गायकवाड : कांबळे माणूस आहेत. स्वतःचे निर्णय घ्यायला स्वतंत्र आहेत.

प्रा. गुप्ते : ते ढीग स्वतंत्र असतील. पण इकडं कॉलेजच्या प्रॉपर्टीचं काय ? तरुण मुलींच्या अब्रूचं काय ? आमच्या सगळयांच्या जिवाचं काय ?

प्रा. गायकवाड : याचा निर्णय कॉलेजच्या मॅनेजमेंटनं घ्यायचा आहे. मॅनेजमेंट करणारी माणसंच आहेत. स्वतःचे निर्णय घ्यायला तीही समर्थ आहेत.

प्रा. चव्हाण : आणि तुम्ही ? या कॉलेजचे स्टाफ मेंबर म्हणून तुमचीही काही जबाबदारी आहे की नाही ?



प्रा. गायकवाड : स्टाफ मेंबर म्हणून माझी जबाबदारी फक्त विद्यार्थ्यांना मनापासून शिकवण्याची आहे. माझ्याजवळ जे आहे ते दोन्ही हातांनी भरभरून मी विद्यार्थ्यांना देत असतो.

प्रा. चव्हाण : अर्थात्...अर्थात...पण —

प्रा. गायकवाड : मला वाटतं, ही चर्चा आपण इथं संपवावी. माझा एम्. ए. चा तास आहे. अच्छा, निघतो मी. ( निघून जातात. )

प्रा. चव्हाण : महार ते महार आणि वर पेठ बघा.

प्रा. ऋषी : कालाय तस्मै नमः ।

[ इतक्यात टेलिफोनची घंटा खणखणते. ]

प्रा. चव्हाण : ( फोन उचलून ) हॅलो ऽऽऽ

प्रा. ऋषी : हळू ऽऽऽ ! फोनमध्येसुद्धा किती मोठ्यानं ओरडताय —

प्रा. चव्हाण : ( खालच्या आवाजात ) हलो...येस...एम्. एस. कॉलेज. व्हाइस प्रिन्सिपल ऋषींच्या ऑफिसमधून बोलतोय मी...कोण ? ओ ऽऽ .. नमस्कार डॉक्टर —

प्रा. ऋषी : ( हळू आवाजात 'कोण ?' म्हणून विचारतात. )

प्रा. चव्हाण : ( फोनवर हात ठेवून ) सिव्हिल हॉस्पिटलमधून डॉ. गुणे बोलताहेत. ( फोनमध्ये ) बोला डॉक्टरसाहेब, मी प्रा. चव्हाण बोलतोय. ( ऐकतात. एकदम कावरेबावरे होतात. ) बाप रे...काय म्हणताय ?...हं हं...हं हं...हं हं...माय गॉड ! कधी आणलं ? बरं बरं ... हो, मी ताबडतोब फोन करतो सगळीकडं...येस् येस् थँक्स ! ( फोन ठेवत ) भयानक...भयानक...भयानक प्रकार घडलाय !

प्रा. ऋषी : काय घडलंय ?

प्रा. गुप्ते : अहो, असे सुन्न बसून काय राहिलात ? सांगा तरी काय झालंय ?

प्रा. चव्हाण : हॉरिबल...हॉरिबल !

प्रा. गुप्ते : काय हॉरिबल ?

प्रा. चव्हाण : पुण्याहून येणारी एस. टी. बस आणि इकडून जाणारा टँकर यांची सुप्याच्या घाटात टक्कर झाली. तीन प्रवासी जागच्या जागी ठार आणि चौदा जखमी झालेत. सगळयांना सिव्हिल हॉस्पिटलमध्ये आणलंय. प्रिन्सिपल अभ्यंकर त्याच एस. टी. त होते. त्यांनाही आणलंय.

प्रा. ऋषी : राम राम ! ( मटकन् बसतात. )

प्रा. चव्हाण : त्यांची परिस्थिती फार गंभीर आहे. इंटेन्सिव्ह केअर वॉर्डमध्ये ठेवलंय.

प्रा. गुप्ते : बाप रे...

प्रा. ऋषी : बंगल्यावर वहिनींना कळवायला हवं...मॅनेजिंग कमिटीच्या मेंबर्सना कळवा-